नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/02/2023 (शुक्रवार) दुपार

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा खुमारी ता. रामटेक येथे दिनांक २३.०२.२०२३ चे ०१.०० वा. ते ०१.१५ वा. दरम्यान रामटेक पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन रामटेक पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन कंटेनर क्र. MH 40 HD 9658 क्रमांकाच्या गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे– १) इमरान खान यासीम खान, वय ३४ वर्ष, रा. देवरी त. बिच्छुआ राज्य मध्यप्रदेश २) अजय भाऊदास पडवार, वय ३४ वर्ष, रा. लालबर्रा जि. बालाघाट राज्य मध्यप्रदेश ३) हुसैन राजीक शेख पडवार, वय २५ वर्ष, रा. लालबर्रा जि. बालाघाट राज्य मध्यप्रदेश ४) सैफ अफजाल कुरेशी पडवार वय २० वर्ष, रा. बरवा रसुलपुर त. पुकराय जि. कानपुर (उ.प्र.) हे काळया रंगाचे ३६ हेले प्रत्येकी १०,०००/– रू. प्रमाणे ३,६०,०००/– रू. व कंटेनर क्र. MH 40 HD 9658 किंमती अंदाजे १०,००,०००/– रू. असा एकुण वाहनासह १३,६०,०००/– रूपयाचा मुद्देमाल घेवुन जातांनी मिळुन आले. सदर कंटेनर मधील हेले व म्हैस यांना कोणत्याही चारापाण्याची व्यवस्था न करता तसेच त्यांचे डोके व सिंगे दोरीने कंटेनरच्या फाटयाला बांधुन क्रुर व निर्दयतेने वागणुक देत घेवुन जात असतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातून वाहनासह असा एकुण किंमती अंदाजे १३,६०,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी नामे– परि. पोलीस उपनिरीक्षक कार्तिक शंकर सोनटक्के पोलीस स्टेशन रामटेक यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(१), (अ), (ड), (इ), (एफ), (आय) प्राणी छळ प्रतीबंध अधिनियम सहकलम ९ पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पाण्डेय मो. नं. ७०३०५४१००१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर